आरबीआय/२००४/८२
बीपीडी.पीसीबी.सर्क्यु. ३६/१३.०८.००/२००३-०४ फेब्रुवारी २७, २००४

सर्व प्राथमिक(नागरी) सहकारी बँकांचे
मुख्य कार्यकारी अधिकारी

माननीय महोदय,

**<u>मदत रोख्यांच्या सुरक्षेसमक्ष तारणावर</u>**
**<u>अग्रिमे मंजूर करणे</u>**

कृपया, बँकानी त्या १० % मदत रोखे १९९३ च्या सुरक्षेसमक्ष तारणावर अग्रिम मंजूर करू शकतात असे कळविणाऱ्या आमच्या परिपत्रक युबीडी.क्र.पीसीबी.८२/डीसी (१३.०८.००) दिनांकित जून २, १९९३ (त्यासंबंधातील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या अटींनुसार) चा संदर्भ घ्यावा.

२) जसे आपण जाणता, भारत सरकारने वेळोवेळी वेगवेगळ्या व्याज दराने आणि मुदतपूर्ती कालावधीचे मदत रोखे निर्गमित केले आहेत. एजन्सी बँकांच्या जोडपत्रात दिलेल्या ३० निर्दिष्टीत शाखाद्वारे आता रोखे डिमटेरियलाइजड स्वरूपात म्हणजे बाँड लेजर खाते स्वरूपातहि निर्गमित करण्यात येत आहेत. आमच्याकडे अशी विचारणा केली जात आहे कि, बँका सदरहू रोख्यांच्या तारणावर अग्रिमे मंजूर करू शकतात कां? आम्ही स्पष्ट करतो कि, उक्त प्रमाणे निर्गमित केलेले वेगवेगळ्या मालिकांतील रोखेहि कर्जाच्या मंजूरीसाठी आमच्या परिपत्रकात सविस्तर दिलेल्या खालील अटींच्या अधीन सुरक्षा म्हणून पात्र आहेत.

१) बँकानी हेतूच्या स्वीकरार्हतेची, कर्जाच्या गरजेची आणि दिलेल्या कर्जाच्या अंतिम उपयोगाची स्वतःशी खात्री करून घ्यावी आणि केवळ मदत रोखे सुरक्षा म्हणून उपलब्ध आहेत एवढ्याच आधारावर राहू नये.
२) व्याजाचा दर भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार असावा.
३) उचित दराने व्याज आणि मुद्दलाच्या परतफेडीत काही कसूर झाल्यास ती सामावून घेण्यासाठी पुरेसे मार्जिन ठेवावे.
३. असे निदर्शनास आले आहे कि, अनेक बँकानी सदरहू रोखे कर्जाचे वाटप करण्यापूर्वी आपल्या नावे हस्तांतरित करून घेतले आहेत. त्या कर्ज मंजूर केल्याच्या तारखेपासून २-३ वर्षे उलटल्यानंतर किंवा रोखे मुदतपूर्तीनंतर परतफेडीसाठी देय झाल्यानंतर भारतीय रिझर्व बँकेच्या सार्वजनिक ऋण कार्यालयाकडे /एजन्सी बँकेच्या निर्दिष्ट शाखेकडे विषय संदर्भित करतात. काही बँका तर असेहि कळवितात कि, त्यांच्याकडे तारण ठेवलेले परंतु त्यांच्या नावे न केलेले रोखे गहाळ झाले आहेत. खोट्या रोख्यांच्या/प्रमाणपत्रांच्या काही घटनाही आमच्या नजरेला आल्या आहेत. असे प्रकार, सहेतूक किंवा अहेतूक, फसवणूकीकडे नेणारे आहेत. तुमच्या बाजूने अशा रोख्यांसमक्ष वेगवेगळ्या बँका मंजूर करीत असलेल्या कर्जाना प्रतिबंध करण्यासाठी नियंत्रक यंत्रणा निर्माण करणे ही तातडीची गरज आहे.
४. त्यासाठी बँकाना सावधगिरी बाळगण्याची आणि मदत रोखे/प्रमाणपत्रांसमक्ष कर्ज मंजूर करताना खालील पैलूंवर लक्ष ठेवण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
१) बाँड लेजर खात्यासहित सरकारी सुरक्षापत्रांसमक्ष कर्जदात्या बँकेने धारणाधिकाराची नोंद करण्याची कोणतीहि तरतूद नाही. जर कर्जदार बँकेला सरकारी सुरक्षापत्रे तारण हमी म्हणून

पाहिजे असतील तर ती बँकेच्या नावे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या संबंधात, आम्ही पुढे जाऊन सल्ला देतो कि अस्तित्वातील सूचनांनुसार, मदत रोखे अशा रोख्यांच्या सुरक्षेसमक्ष अग्रिमे प्राप्त करण्याच्या मर्यादित उद्देशाने बँकेच्या नावे हस्तांतरित करण्यात आले तर कोणत्याहि बँकिंग कंपनीला धारण करता येतील.

२) मदत रोख्यांसमक्ष तृतीय पक्षी कर्ज मंजूर करता येणार नाही.

३) भारत सरकारच्या अधिसुचनेनुसार, बचत रोखे कर्जासमक्ष सुरक्षा म्हणून धारण करण्यास पात्र नाहीत.

नागरी सहकारी बँकाना सतर्क राहण्याचा आणि त्यांच्या बँकेत अशी अनियमितता होऊ नये यासाठी योग्य ते सुरक्षेचे उपाय योजण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

५. कृपया आमच्या विभागीय कार्यालयाला पोंच पावती द्यावी.

आपला विश्वासू

(एस. करुप्पासामी)

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

जोडपत्र : जोडणी १

जोडणी १

भारत सरकार  मदत/बचत रोखे योजना

एजन्सी बँकांची सूचि

| अनु. क्र. | एजन्सी बँकेचे नाव |
|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक |
| २ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद |
| ३ | स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपुर |
| ४ | स्टेट बँक ऑफ मैसुर |
| ५ | स्टेट बँक ऑफ पतियाला |
| ६ | स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र |
| ७ | स्टेट बँक ऑफ त्रावणकोर |
| ८ | स्टेट बँक ऑफ इंदोर |
| ९ | अलाहाबाद बँक |
| १० | बँक ऑफ बरोडा |
| ११ | बँक ऑफ इंडिया |
| १२ | बँक ऑफ महाराष्ट्र |
| १३ | कॅनरा बँक |
| १४ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |
| १५ | कॉर्पोरेशन बँक |
| १६ | देना बँक |
| १७ | इंडियन बँक |
| १८ | इंडियन ओव्हरसीज बँक |
| १९ | ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स |
| २० | पंजाब नॅशनल बँक |
| २१ | सिन्डिकेट बँक |
| २२ | युनियन बँक ऑफ इंडिया |
| २३ | युनायटेड बँक ऑफ इंडिया |
| २४ | युनायटेड कमर्शियल बँक |
| २५ | विजया बँक |
| २६ | युटीआय बँक लि. * |
| २७ | आयसीआयसीआय बँक लि. * |
| २८ | आयडीबीआय बँक लि. * |
| २९ | एचडीएफसी बँक लि. * |
| ३० | एसएचसीआयएल लि. * |

* अखिल भारतीय प्रचालन मुंबईत केंद्रित

सीः/आरबीडी.सीओ.इन्व्हेस्ट/रिलिफ बॉंड-सर्क्युलर. डॉक्यु.